# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची कामगाराविषयक चळवळ

**डॉ. अर्जुन डी. म्हाळुंगेकर** इतिहास विभाग डी.के.ए.एस्.सी. कॉलेज, इचलकरंजी, ता.हातकणंगले, जि. कोल्हापूर.

---

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सार्वजनिक कार्यात पदार्पण सन १९२० च्या दशकात झाले. ते विसाव्या शतकातील महापुरुष होते. दलित मुक्तिलढ्यास आरंभ करून या देशातील दलितांची अस्मिता जागवली ती बाबासाहेबांनी. डॉ. बाबासाहेब आंबेडकर ही महान व्यक्ती होती, तसेच समाजक्रांतीचे तत्वज्ञान मांडणारी विराट शक्ती होती. भारतातील समाजव्यवस्था जातिभेदावर उभी असून ती सर्वांना सामाजिक दृष्ट्या समान वागणूक देत नव्हती, वर्षानुवर्षे ती अमानवी व असहिष्णूही राहिली आहे, म्हणूनच ती बदलली पाहिजे ही त्यांची मनोभावना होती. प्रत्येक व्यक्तीला सामाजिक, राजकीय, आर्थिक व सांस्कृतिक हक्क आहेत आणि त्यांचे हक्क जन्माच्या किंवा परंपरेच्या कुठल्याही कारणामुळे नाकारले जाता कामा नयेत अशी त्यांची धारणा होती. त्यामुळे डॉ. आंबेडकरांच्या एकूण सार्वजनिक योगदानात सर्वप्रथम जो पैलू पुढे आला तो सामाजिक परिवर्तनाचा.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केवळ दलित समाजालाच न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला असे नाही, तर एकूणच शोषित, पीडित व कष्टकरी कामगारांच्या कल्याणाचा विचारही त्यांच्या मनामध्ये होता. दुर्बल, असंघटीत विखुरलेल्या दलित कामगारांवर अन्याय होत होता, क्षुल्लक कारणांवरून कामगारांना नोकरीतून काढून टाकले जात होते. पण याकडे इंग्रज व भांडवलधार्जिण्य कामगार नेत्यांकडून जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात होते. या गोष्टींची बाबासाहेबांच्या मनामध्ये प्रचंड चिड निर्माण झाली. भांडवलदार व कारखानदारांकडून कामगारांची होणारी पिळवणूक, होणारा अन्याय व अत्याचाराला वाचा फोडून न्याय मिळवून देण्यासाठी शेतकरी व कामगार यांच्यातील स्वाभिमान जागृत करण्यासाठी तसेच इंग्लंड अमेरिकेसारख्या प्रगत देशात राहिलेल्या बाबासाहेबांना आपल्या देशात एकपक्षी आणि एकांगी लोकशाही निर्माण होणे धोक्याचे वाटले. लोकशाही देशात सत्ताधारी पक्षाकडून काही महत्वाचे कार्य होण्यासाठी जागरूक असा प्रबल विरोधी पक्ष हवा, या व्यापक भूमिकेतून प्रेरित होऊन डॉ. आंबेडकरांनी स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना केली. त्याकाळी कामगार संघटना ही वर्णव्यवस्थेवर आधारलेली होती. वर्णव्यवस्थेला चिकटून असलेला भांडवलदार आणि कारखानदार वर्गाकडून कामगारांना कारखान्यात न्याय मिळत नव्हता. अशा वर्गाकडून कामगारांना कसा न्याय मिळणार ? म्हणूनच कामगाराला न्याय मिळवून देण्याचा भक्कम मार्ग म्हणून डॉ. आंबेडकरांनी मजूर पक्षाची स्थापना करून कारखानदारांच्या प्रश्नांना वाचा फोडली. कामगारांच्या असंघटीतपणामुळेच कामगार शक्ती, आणि त्यांचे विचार एकत्र केले. स्वतंत्र मजूर पक्षाचे अध्यक्ष या नात्याने त्यांनी सर्व स्त्री-पुरुष कामगार, बाल कामगार यांचे हक्क अबाधित ठेवण्याचा, त्यांना स्वातंत्र्य मिळवून देण्याचा यशस्वी प्रयत्न केला. बाबासाहेबांनी कामगारांना उद्‌देशून सांगितले की, स्वतंत्र मजूर पक्ष हा कोणत्याही एका जातीधर्मापूरता मर्यादित नसून तो देशातील श्रमजीवी जनतेच्या सामाजिक, आर्थिक व राजकीय हक्क शोधण्यासाठी निर्माण केलेले आहे. कामगारांना वर्णाश्रमी, मनुवादी प्रवृत्तीच्या सनातनी व्यवस्थेतून बाहेर पडण्याचे बाबासाहेबांचे विचार केवळ भारतालाच नव्हे तर साऱ्या जगाला मार्गदर्शक ठरतात. कारण त्यांचा मजूर पक्ष देशातील मागासलेल्या शेतीपध्दतीच्या जागी नवीन सहकारी तत्त्वावर शेतीसुधारणेचा कार्यक्रम, तसेच शेतकरी व कामगार यांची आर्थिक स्थिती सुधारणार होता. मोफत व सक्तीचे शिक्षण कार्यक्रम हाती घेणार होता. प्रांतिक विद्यापीठे स्थापणार होता आणि कराचा कमीत कमी बोजा गरीब कामगारांवर पडेल याची दक्षता घेणार होता. तसेच कामगाराच्या मजूरीची किमान मर्यादा अर्थातच कामाचे तास, बालकामगारांसाठी व कामगारांच्या मुलांसाठी मोफत व सक्तीच्या शिक्षणाची तरतूद, स्वस्त घरे इ. सर्व सुविधा कामगारांसाठी झाल्या पाहिजेत अशा अग्रही भूमीकेने डॉ. बाबासाहेबांनी हा अराखडा तयार केला आणि तो आमलात आणण्यासाठी खास प्रयत्न केले. म्हणूनच आज कामगार संघटनांना कारखानदारी जगतात विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

शेतकऱ्यांच्या संघटनेप्रमाणे रेल्वे कामगारांची संघटना घडवून आणण्याचे काम डॉ. आंबेडकरांनी हाती घेतले. १२ व १३ फेब्रुवारी १९३८ रोजी मनमाड येथे रेल्वे कामगारांची परिषद भरविली. रेल्वेमधील दलित वर्गाच्या परिषदेचे अध्यक्षपद भूषवून परिषदेतील कामगारवर्गाला उद्देशून बाबासाहेब म्हणतात- ''आतापर्यंत आपण सामाजिक अन्यायाविरूध्द लढा देत आहोत पण आज आपण आर्थिक विषमतेविरूध्द लढा देण्यासाठी एकत्र आलो आहे. या देशातील कामगारांना दोन शत्रूविरूद्ध लढा द्यावा लागणार आहे तो म्हणजे ब्राह्मणशाही आणि भांडवलशाही. त्यापैकी ब्राह्मणशाही म्हणजे स्वातंत्र्य, समता व बंधुत्व यांचा अभाव.'' डॉ. आंबेडकरांचा भर कामगार ऐक्यावर होता. ते म्हणतात कामगारवर्गाला जात प्रथा असेल तर कामगारांचे ऐक्य कसे होणार. तेव्हा त्यांनी समान पक्षावर संघटीत व्हायचे आणि संघटनेच्या बळावर आपले प्रश्न सोडविले पाहिजेत असे कामगारांसमोर स्पष्ट केले. धनंजय किर यांनी दिलेल्या माहितीनुसार मनमाड येथे रेल्वे कामगार परिषदेच्यावेळी बोलताना बाबासाहेब म्हणतात, ''कुमार अवस्थेत मी नातलगांचे

जेवणाचे डबे पोहचविण्याचे काम केलेले असल्याने कामगारांच्या प्रश्नाविषयी मला चांगली माहिती आहे. कामगारामध्ये फूट पडेल या भितीने अस्पृश कामगारांवरील होणारा अन्याय जूने कामगार दूर करण्याचा प्रयत्न करीत नसत. आजपर्यंत आपण सामाजिक अन्याय व गाऱ्हाणी दूर करण्यात यशस्वी झालो. आता आर्थिक अडचणी दूर करण्याचे काम हाती घेतले. आपण कामगार म्हणून येथे आज जमलो आहे. मी देशाचा व कामगारांचा शत्रू आहे असे समजतात, पण ब्राह्मणशाही आणि भांडवलशाही हेच कामगारांचे खरे शत्रू आहेत. कामगारांमध्ये एकजूट घडून यायची असेल तर ब्राह्मणशाहीचे निर्मूलन केले पाहिजे असा उपदेश त्यांनी कामगारांना केला.

७ नोव्हेंबर १९३८ रोजी स्वतंत्र मजूर पक्ष आणि गिरणी कामगार युनियननेच एक दिवशीचा संप करण्याचे जाहीर केले. संप करणे हा कामगारांचा हक्क आहे असे यापूर्वी विधीमंडळात बाबासाहेबांनी सांगितले होते. तरीही कामगारांच्या संपाला काँग्रेस व कामगार नेत्यांनी प्रचंड विरोध केला. असे असूनही बाबासाहेबांच्या नेतृत्वाखाली निरनिराळ्या साठ कामगार संघानी संप करण्याचे निश्चित करून संपाचे रणशिंग फुंकले. संपाच्या आदल्या दिवशी जमनादास मेथा यांच्या अध्यक्षतेखाली बैठक भरून कार्यक्रमाची रूपरेषा पक्की केली. या बैठकीसाठी डॉ. आंबेडकर, परूळेकर, मिरजकर, निमकर, डांगे इ. नेते उपस्थित होते. ठरल्या तारखेनुसार ७ नोव्हेंबरला सकाळी संप शांततेच्या वातावरणामध्ये सुरू झाला. डॉ. आंबेडकर आणि जमनादास एका मोटारीतून कामगारांना ध्वनिक्षेपावरून संप यशस्वी करण्यासाठी सतत सांगत होते. मात्र भांडवलशाहीने पोसलेली व काँग्रेसकडून चालविलेली वृत्तपत्रे संपाला विरोध करीत, असे असूनही सर्व प्रांतातील औद्योगिक शहरातून तसेच अहमदाबाद, अंमळनेर, जळगाव, पुणे, धुळे व चाळीसगाव इ. शहरापर्यंत संपाचे लोप पसरले. संध्याकाळी कामगार मैदानावर कामगारांची प्रचंड सभा भरली. सभेचे अध्यक्ष मेथा होते. यावेळी निमकर, डांगे, मिरजकर इ. नेत्यांनी काळ्या कायद्याचा धिक्कार केला. डॉ. आंबेडकरांनी आपल्या भाषणामध्ये कामगारांनी संप यशस्वी घडवून आणल्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले या संपाचे श्रय म्हणजे प्रथमश्रेणीचे कामगार नेते म्हणून आंबेडकरांची सर्वत्र ख्याती झाली. १ जानेवारी १९४३ रोजी ऑल इंडिया रेडिओ स्टेशनवरून केलेल्या भाषणात डॉ. आंबेडकर म्हणतात, ''कामगारांना स्वातंत्र हवे आहे. यात केवळ निर्बंधाचा अभाव नव्हे तर लोकांनी लोकांसाठी चालविलेल्या सरकारची संकल्पना आहे. त्यांच्या मते लोकांद्वारे सरकार म्हणजे संसदीय लोकशाही नव्हे. तर कामगारांना वस्तुतः स्वातंत्र्य हवे आहे. दुसरे म्हणजे स्वातंत्र्यामध्ये समान संधीचा अधिकार समाविष्ट आहे. प्रत्येक व्यक्तीला त्याच्या गरजेनुसार वृध्दीसाठी संपूर्ण सुविधा पुरविणे हे राज्याचे कर्तव्य आहे. समानता याचा कामगारांच्या मते अर्थ आहे कायद्यातील प्रत्येक प्रकारच्या सवलती रद्द करणे. म्हणजे वस्तुतः असमानतेला जन्म देणाऱ्या सर्व प्रक्रिया रद्द करणे होय. कामगारांना बंधुता हवी आहे. सर्व वर्ग आणि सर्व राष्ट्रे एकत्रित करून पृथ्वीवर शांतता आणि मनुष्यप्रती सदिच्छा, हे घोषवाक्य असलेली मानवी बंधुत्वाची भावना त्यांना अभिप्रेत आहे. नवी व्यवस्था कामगारांसाठी आदर्श आहे. आणि फ्रेंच राज्यक्रांतीत तिची पाळेमुळे रूजलेली आहेत. स्वयं शासन आणि स्वयंनिर्धार या दोन तत्त्वांचा उदय या क्रांतीतून झाला यालाच राष्ट्रवाद म्हणतात.

डॉ. बाबासाहेब मजूर मंत्री असताना त्यांनी कामगारांच्या हिताचे अनेक ठराव मांडले ते असे, खाणीमध्ये काम करणाऱ्या कामगार स्त्रियांना आणि पुरुषांना काम करून घरी परत जाताना स्वाभिमानाने व स्वच्छतेने जाता यावे म्हणून स्नानगृह असावे अशी तरतूद केली. तसेच कामगार स्त्रियांना प्रसूतिपूर्व आणि प्रसूतिपश्चात सुट्टीचा ठराव, कामगारांसाठी निवृत्ती निर्वाह वेतन योजना, स्त्री-पुरुषांना समान वेतन असा ठराव, बालकामगारांसाठी व कामगारांच्या मुलांसाठी मोफत व सक्तीच्या शिक्षणाची तरतूद, कामगारांचे कामाचे तास, स्वस्त घरे, भरपगारी रजा, आजारी रजा, वृध्दत्व काळात पेन्शन, अपघाती नुकसान भरपाई अशा आग्रही भूमिकेने बाबासाहेबांनी हा आराखडा तयार केला आणि तो अमलात आणण्यासाठी तसे खास प्रयत्न केले. म्हणूनच आज कामगार संघटनांना कारखानदारी जगतात विशेष महत्व प्राप्त झाले. १० मार्च १९४५ रोजी स्टँडिंग लेबल कमिटीमध्ये केलेल्या अध्यक्षीय भाषणात डॉ. बाबासाहेब म्हणतात, ''प्रा. आडारकर समितीने सादर केलेल्या अहवालाचे स्वागत केले. या समितीने औद्योगिक कामगारांसाठी आरोग्यविमा या विषयाच्या वेगवेगळ्या पैलूंवर केलेल्या विविध सूचनांवर आंबेडकरांनी चर्चा घडवून आणली. अशा प्रकारची योजना लवकरात लवकर कार्यान्वित करावी असा आग्रह बैठकीमध्ये धरण्यात आला. तसेच ही योजना सर्व संघटीत उद्योगातील कामगारांसाठी लागू करण्यात यावी अशी सूचना केली. त्यानुसार केंद्र सरकारने प्रांतिक सरकारशी तसेच उद्योजक आणि कामगार संघटना यांच्याशी सल्लामसलत करून, त्यानंतरच पूर्व विचारांती तसे विधेयक, केंद्रीय कायदेमंडळाला सादर करण्यात यावे अशी मागणी करण्यात अली.

डॉ. आंबेडकर यांनी १९३६ ते ४२ पर्यंत स्वतंत्र मजूर पक्षाच्या निशाणाखाली पक्षनेते या नात्याने शेतकरी, कामगार यांचे प्रश्न, त्यांचे हक्क यासाठी विधिमंडळात व विधि मंडळाच्या बाहेर सतत लढा दिला. अस्पृश, कामगार, शेतकरी यांना संघटीत करण्यासाठी परिषदा, मेळावे, सभा घेवून जनमत जागृत केले. त्यांनी स्वतंत्र मजूर पक्षाचा जाहीरनामा प्रसिध्द केला, तो प्रत्यक्ष अमलात आणण्याच्या

दृष्टीने पावले उचलली. अस्पृश, कामगार, शेतकरी यांना संघटीत करण्यासाठी परिषदा, मेळावे, सभा घेवून जनमत जागृत केले. औद्योगिक कलह बिल बंद पाडण्यासाठी वतनदारी, शोषण करणारी खोती पध्दत रद्द करण्यासाठी चळवळी सुरू केल्या. तरीही अस्पृश, कामगार, शेतकरी यांचे प्रश्न पूर्णपणे सुटू शकले नाहीत कारण काँग्रेसपक्षाने बहुमताच्या जोरावर महार वतन रद्द करण्याचे व खोती पद्धत रद्द करण्याचे टाळले. आपल्या चळवळीला व्यापक अधिष्ठान लाभावे, सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक अशा सर्वांगासाठी ती चळवळ समाज परिवर्तनाच्या दिशेने प्रगत व्हावी असे बाबासाहेबांना वाटत असे. परंतु जातीसंस्था ही इतकी खोलवर रूजली आहे की तिने शेतकरी, कामगार यांना शेतकरी कामगार म्हणून जातीनिरपेक्ष भूमिका घेवू दिली नाही. तेंव्हा मजूरांच्या समोर बोलताना बाबासाहेब म्हणाले, जगामध्ये गरीब व श्रीमंत असे दोन वर्ग आहेत. पिळले जाणारे व पिळविणारे. म्हणूनच शेतकरी कामगार यांनी आपल्या दैन्याची कारणे कोणती आहेत त्याचा पूर्णपणे विचार करावा. त्यांच्या दैन्याची कारणे ही त्यांना मिळणाऱ्या श्रीमंतीतच असल्याने जातिनिरपेक्ष बुध्दीने मजूरांची आघाडी संघटीत केली पाहिजे. १० मे १९४३ च्या इंडीयन फेडरेशन ऑफ लेबर या मुंबई शाखेच्या सभेतील कामगारांना मार्गदर्शन करताना डॉ. आंबेडकर म्हणतात, ''भारतामध्ये कामगारांनी कामगार मंत्रीमंडळ स्थापन करण्याचा प्रयत्न करावा. भारताला स्वातंत्र्य मिळणे एवढीच गोष्ट पुरेशी नाही, तर ते स्वराज्य कोणत्या लोकांच्या हातात पडते याला महत्व आहे. यावरून डॉ. बाबासाहेब हे देशाच्या स्वातंत्र्याकडे किती विशाल दृष्टीकोणातून पहात होते हे दिसून येते. मिळणाऱ्या स्वातंत्र्यात सर्वसामान्य कष्टकऱ्यांनाही वाटा मिळाला पाहिजे असे त्यांचे स्पष्ट मत होते. दि. ७ व ८ ऑगष्ट १९४३ रोजी त्यांच्या अध्यक्षतेखाली पक्ष कामगार परिषदेचे दुसरे अधिवेशन भरले. या अधिवेशामध्ये आंबेडकरांनी भांडवलात व कारखानदारांकडून कामगारांवर होणाऱ्या अन्यायाची वस्तुनिष्ठ मांडणी करून अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य, शिक्षण व सांस्कृतिक साधने कामगारांना मिळाली पाहिजेत अशी जोरदार मागणी केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या क्रांतीकारक विचारसरणीमूळे कामगारांच्यामधील आशा आकांक्षा उंचावल्या. तसेच कामगारांच्या जीवनामध्ये सुधारणा घडून येण्यास प्रारंभ झाला. त्यांचे हे कार्य म्हणजे कामगारांच्या जीवनाला दिशा देणारे ठरले. डॉ. बाबासाहेब मजूर मंत्रीपदावर असताना त्यांनी आपल्या काराकीर्दीत कामगारांचे हित करणारे अनेक महत्वाचे निर्णय घेतले. त्यांच्या सामाजिक भाष्याचा दुसरा पैलू म्हणजे त्यांचे लोकशाही प्रणालीविषयीचे प्रकट चिंतन. त्यांना वंचित समूहांचे हित सर्वात महत्वाचे वाटत होते. त्यापैकी खासकरून कामगारांसाठी तर ते नेहमीच अधिक सक्रिय पुढाकर घेत राहिले. मुंबई विधिमंडळात ट्रेड डिस्प्युट बिलावर भाष्य करताना ते म्हणतात- ''ज्या लोकशाहीत, जीविताची साधने हाती नसलेल्या, संघटनेच्या दृष्टीने विस्कळीत असलेल्या अशिक्षित व बुद्धिहीन अशा कामगारांवर गुलामगिरीची बंधने लादण्यात येतात ती लोकशाहीच नव्हे, तर ते विडंबन आहे. २६ ऑक्टोबर १९३८ रोजीच्या केलेल्या भाषणात ते म्हणतात, कामगारांना यापुढेही या व्यवस्थेशी सतत झगडा करत रहावे लागेल असे ते कामगारांना आवर्जून सांगतात.'' बाबासाहेबांचे जीवन म्हणजे एक अखंड ज्ञानसाधना होती. समतेसाठी सर्वस्व अर्पण करूनही न संपलेले ते एक युद्ध होते. भगवान बुध्दांचा धम्म विचार, कबीरांचा प्रेमभाव व जोतीरावांची बंडखोरी बरोबर घेवून बाबासाहेबांनी भारतीय इतिहासाचा एक विराट कालखंड कर्तृत्वाच्या प्रकाशाने उजळून टाकला.

**संदर्भ -**


१) डॉ. नरेंद्र जाधव (अनुवादक आणि संपादक), 'बोल महामानवाचे', डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची ५०० मर्मभेदी भाषणे (खंड दोन), ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, २०१२, पृ. १९

२) भीमराव कुलकर्णी, 'बाबासाहेब आंबेडकर', सुविचार प्रकाशन मंडळ, पुणे, १४ एप्रिल, १९६६, पृ. ६९

३) दै. सम्राट, (डॉ. करुणा जमदाडे), 'मजूर मंत्री डॉ. बाबासाहेबांचे ऐतिहासिक कार्ये', रवि. ६ मार्च, २०११, पृ. ४

४) भालचंद्र फडके, 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर', श्री. विद्या प्रकाशन, पुणे, १९८५, पृ. १९७

५) धनंजय किर, 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, एप्रिल १९६६, पृ. ३१४

६) उपरोक्त, धनंजय किर, पृ. ३२३

७) उपरोक्त, धनंजय किर, पृ. ३२५, ३२६

८) डॉ. नरेंद्र जाधव (उपरोक्त खंड-२), पृ. ३३२, ३३३

९) दै. सम्राट, उपरोक्त, डॉ. करुणा जमदाडे, पृ. ४

१०) डॉ. नरेंद्र जाधव (खंड-२), पृ. ३८०

११) भालचंद्र फडके (उपरोक्त), पृ. २०२, २०३

१२) दै. सम्राट ३१ जाने. २०११ (प्रा. मिना गायकवाड), डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची कामगार विषयक भूमिका, पृ. ४

१३) उपरोक्त, डॉ. नरेंद्र जाधव, पृ. २२, २३